नोंदणी क्र. महा/नाशिक/५६३/२०२०. दि. १० सप्टेंबर २०२०

Reg. No.: Maha/Nashik/563/2020 Dated 10 Sep. 2020

अल्युमनी असोसिएशन ऑफ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक – ४२२ २२२

ज्ञानगंगा घरोघरी

Alumni Association of Yashwantrao Chavan Maharashtra Open University

Dnyangangotri, Near Gangapur Dam, Goverdhan, Nashik - 422 222

## Alumni Cell AY 2023-24

## Minutes of Meeting

Date: 08/07/2023

अल्युमनी असोसिएशन ऑफ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२ २२२. वेबसाईट : http://www.ycmou.ac.in
ईमेल : alumniycmou@ycmou.ac.in

दिनांक : १०/०७/२०२३

### कार्यवृत्त

अल्युमनी असोसिएशन ऑफ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ या संस्थेची सभा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील व्यवस्थापन मंडळ सभागृहात शनिवार दि. ०८/०७/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सभासदांचे नाव | हुद्दा/पद |
|---|---|---|
| १. | **प्रा. संजीव सोनवणे** | कुलगुरू |
| २. | श्री. भटूप्रसाद पाटील | कुलसचिव तथा अध्यक्ष |
| ३. | डॉ. गोविंद कतलाकुटे | वित्त अधिकारी तथा उपाध्यक्ष |
| ४. | श्री. संतोष साबळे | सरचिटणीस |
| ५. | डॉ. प्रकाश देशमुख | सदस्य तथा संचालक, विद्यार्थी सेवा विभाग |
| ६. | डॉ. सुभाष सोनुने | समन्वयक |
| ७. | श्री. राहुल खैरनार | सदस्य |
| ८. | डॉ. संजीवनी महाले | सदस्य |
| ९. | डॉ. नितीन ठोके | सदस्य |
| १०. | कविता राऊत | सदस्य |

सभेच्या सुरुवातीला सरचिटणीस श्री. संतोष साबळे यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

# कार्यवृत्त

**विषय क्र. १ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**ठराव :** या बैठकीत सचिव श्री. संतोष साबळे यांनी मागील बैठकीचे इतिवृत्त वाचले. सदर इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. २ विद्यापीठाचे नूतन कुलगुरू तथा माजी विद्यार्थी डॉ. संजीव सोनवणे यांचा सत्कार**

**ठराव -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असलेले प्रा. संजीव सोनवणे हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नियुक्त झाल्याबद्दल भारताची धावपटू तथा माजी विद्यार्थिनी कविता राऊत यांच्या हस्ते कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांचा रोपटे देवून सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. विद्यापीठाचे माजी विद्यार्थी यांचा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून लाभल्याबद्दल सर्वांनी आनंद व्यक्त केला.

**विषय क्र. ३ प्रतिष्ठित माजी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या नियमावलीस मान्यता देणे**

**ठराव -**

प्रतिष्ठित माजी विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या नियमावलीचे सचिव श्री. संतोष साबळे यांनी वाचन केले. याबाबत मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी महत्वाच्या सूचना केल्या. सदर नियमावलीत प्रशासन, संरक्षण, दुग्ध व्यवसाय, पशुधन, नाट्य, नृत्य, आदिवासी विकास विभाग, बौद्धिक स्वामित्व, दिव्यांग, माहिती तंत्रज्ञान, नवनिर्मिती-नवउपक्रम या क्षेत्रांचा समावेश करण्याची सूचना केली. त्यास उपस्थित सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सुधारित नियमावलीत सदर बदल करून पुढील बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्याचे ठरले.

**(सोबत तपशीलवार सह्पत्र जोडण्यात आलेले आहे.)**

**विषय क्र. ४ माजी विद्यार्थ्यांची नोंदणी वाढविण्यासाठी विशेष उपक्रम / मोहीम सुरु करणेबाबत चर्चा**

**ठराव** – विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांची नोंदणी वाढविण्यासाठी खासजी कॉर्पोरेट एजन्सी नेमण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. एजन्सी नेमल्याने वेळ आणि पैसे वाचणार असल्याने यासाठी कॉर्पोरेट एजन्सीची माहिती घेवून त्यांच्यासोबत बैठक आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. तसेच विविध क्षेत्रातील निवडक माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्याचे निश्चित करण्यात आले.

**विषय क्र. ५ माजी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलतीबाबत चर्चा करणे**

**ठराव** – यावेळी माजी विद्यार्थ्यांना कोणकोणत्या सुविधा देता येईल यावर विस्ताराने चर्चा झाली. त्यात प्रामुख्याने सर्व माजी विद्यार्थ्यांना मोफत AAOYCMOU ओळखपत्र, सर्व माजी विद्यार्थी, शिक्षक, विद्यार्थी आणि हितचिंतकांशी संवादाची संधी, माजी विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना भेटण्याची संधी, माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्याची संधी, AAOYCMOU च्या वार्षिक उपक्रमांत तथा कार्यक्रमांमध्ये सहभाग, विद्यापीठाच्या अतिथीगृहात ५० टक्के सवलत, अर्थपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन आणि सह-प्रायोजकत्व, करिअर विषयक विविध संधींबाबत मार्गदर्शन, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक बनण्याची संधी, आयुष्यभर शिकण्याची संधी, विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये प्रवेश, सवलतीच्या दरात उपयुक्त साहित्य आणि सेवांचा लाभ, प्रतिष्ठित माजी विद्यार्थ्यांना विशेष मान्यता, प्रतिभा, नावीन्य आणि उत्पादने प्रदर्शित करण्याची संधी, विशेष व्याख्यानांच्या आयोजनास तथा सहभागाची संधी अशा प्रकारच्या सुविधा देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

**विषय क्र. ६ पदसिद्ध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत संस्थेच्या नियमावलीत बदल करून नवीन कार्यकारिणीचे गठन करणे**

**ठराव** – अल्युमनी असोसिएशन ऑफ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ या संस्थेची स्थापना करतेवेळी घटनेत संस्थेचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलसचिव, उपाध्यक्ष म्हणून वित्त अधिकारी तर विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक यांना पदसिद्ध पदाधिकारी तथा सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

दि. ८/७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत पदसिद्ध पदाधिकारी निवडीबाबत चर्चा झाली. त्यात विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना कार्यकारिणीवर पदसिद्ध पदाधिकारी अथवा अधिकारी तथा सदस्य म्हणून न घेता केवळ जे विद्यार्थी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत अशाच विद्यार्थ्यांना कार्यकारिणीवर घेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. विद्यमान कुलसचिव श्री. भटूप्रसाद पाटील हे पदसिद्ध अध्यक्ष असल्याने त्यांच्या जागेवर माजी विद्यार्थी आणि नुकतेच कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारलेले प्रा. संजीव सोनवणे यांची अध्यक्ष म्हणून करण्याची सूचना सरचिटणीस श्री. संतोष साबळे यांनी मांडली. त्यास कुलसचिव श्री. भटूप्रसाद पाटील यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सर्व कार्यकारिणी सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत करून प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षपदाच्या निवडीवर शिक्कामोर्तब केले.

तसेच उपाध्यक्ष तथा वित्त अधिकारी यांच्याऐवजी कार्यकारिणी सदस्या डॉ. संजीवनी महाले यांनी उपाध्यक्षपद सांभाळण्याची सूचना कार्यकारिणी सदस्य डॉ. नितीन ठोके यांनी मांडली. त्यास

कार्यकारिणी सदस्य राहुल खैरनार यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सर्व कार्यकारिणी सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत करून डॉ. संजीवनी महाले यांच्या उपाध्यक्षपदाच्या निवडीवर शिक्कामोर्तब केले. तसेच पदसिद्ध सदस्य असलेले विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख हे माजी विद्यार्थी असल्याने त्यांना कार्यकारिणी सदस्य म्हणून घेण्यावर एकमत झाले. मा. धर्मादाय आयुक्त, नाशिक यांच्याकडून सदर बदलांच्या कार्यवाहीची पूर्तता होईपर्यंत अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलसचिव श्री. भटूप्रसाद पाटील यांनी काम पाहण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ७ कार्यालयासाठी पुरेसे मनुष्यबळ घेणे**

**ठराव** – अल्युमनी असोसिएशनचे कार्यालय कामकाज पाहण्यासाठी एक सहायक आणि एक दैनंदिन वेतनावरील व्यक्ती अशा दोन व्यक्तींची निवड करून त्यांना अल्युमनी असोसिएशनच्या फंडातून मानधन देण्यात यावे याबाबतचा निर्णय झाला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ७ संस्थेच्या कार्यालयासाठी जागा निश्चित करणे**

**ठराव** – अल्युमनी असोसिएशनचे कामकाज करण्यासाठी सध्या दृक श्राव्य केंद्रातील जागा वापरण्याचा निर्णय झाला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ९ मागील आर्थिक वर्षात जमा झालेल्या रकमेचा तपशीलावर चर्चा करणे**

**ठराव** – यासंदर्भात वित्त अधिकारी तथा उपाध्यक्ष यांनी विद्यार्थीनिहाय जमा झालेल्या रकमेचा तपशील सादर केला.

सभेच्या शेवटी सर्व सदस्यांचे समन्वयक डॉ. सुभाष सोनुने यांनी आभार मानले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे समन्वयक डॉ. सोनुने यांनी जाहीर केले.

सचिव

अध्यक्ष

Date: 08/07/2023







Date: 24/01/2024




